# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

**दिनांक १०.०८.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०९.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये २० केसेसमध्ये २० ईसमावर कारवाई करून एकुण ९५,९१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०४ केसेसमध्ये १६ इसमांवर कारवाई करुन २,०६,२१०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,२०४ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ९७,१५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०९.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १०.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०४ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना १२ तासाचे आत अटक. मुद्येमाल हस्तगत.**

दिनांक ०९.०८.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, फिर्यादी रजत राजकुमार गुप्ता वय २३ वर्षे रा. निवासी बुध्द विहारजवळ, जुना फुटाळा, अंबाझरी, नागपूर हे पोलीस ठाणे गणेशपेठ हद्यीत कॉटन मार्केट येथून भाजी खरेदी करुन मेट्रो स्टेशनजवळ रस्ता क्रॉस करीत असता, एका अनोळखी मुलाने त्यांचेजवळ येऊन, त्यांना पत्ता विचारण्याचे बहाण्याने त्यांचे गळयातील काळया धाग्यात असलेले ३ ग्राम सोन्याचे लॉकेट जबरीने हिसकावून त्याचे थोडया अंतरावर उभ्या असलेल्या एका मोपेड गाडीवरील इतर दोन साथीदारासंह पळुन गेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपीविरूध्द कलम ३०४(२),३(५) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व खात्रीशीर माहीती प्राप्त करून, आरोपींना निष्पन्न केले व सापळा रचुन आरोपी नामे १) जुनेद अख्तर खान वय २० वर्षे २) मोहम्मद साजीद शेख उर्फ मोनु मोहम्मद सलिम शेख वय १९ वर्ष ३) फैजान शेख यासीन शेख वय २० वर्ष तिन्ही रा. सिंधीबन, ठाकूर प्लॉट, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपुर यांना ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन सोन्याचे लॉकेट वजनी ३ ग्राम व गुन्ह्यात वापरलेली अॅक्टीवा दुचाकी क्र. एमएच ४९ सीएच ०३१७

व ०२ मोबाईल फोन असा एकुण १,४५,०००/– रू. चा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्‌देमालासह पुढील कार्यवाहीस्तव गणेशपेठ पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (अति.कार्य.डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे मसपोनि. मंगला हरडे, संदीप भोकरे, पोअ. पकंज बागडे, कुणाल लांडगे, अनिकेत इंगळे, संदीप पडोळे यांनी केली.



**<u>३) नंदनवन पोलीसांची कामगिरी :– कॅसिनो मशिन द्‌वारे जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०९.०८.२०२६ चे ११.३० ते १२.३० वा. चे दरम्यान, नंदनवन पोलीसांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्यीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत हसनबाग चौक, कब्रस्तानजवळील लॅाटरी व गेम पार्लर येथे मशिनद्‌वारे जुगार खेळवत आहेत. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून तेथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे संचालक आरोपी क्र. १) सैयद मोहम्मद मुसव्वीरुद्यीन सलामुद्यीन सैयद काजी वय २३ वर्षे, हा आरोपी क्र. २) अब्दुल सलमान अब्दंल सलाम वय ३४ वर्षे, ३) अब्दुल अजीम अब्दुल रहीम वय ३४ वर्षे ४) मोहम्मद अकरम मोहम्मद बैतुल्ला वय ४५ वर्षे, सर्व रा. हसनबाग कब्रस्तान, पहिली गल्ली, नागपुर ५) काशिनाथ दादाजी येवले वय ४७ वर्षे, रा. श्रावण नगर, वाठोडा, ६) मदन काशिनाथ बडगे वय ५६ वर्षे रा. प्लॉट क्र. २४, डायमंड नगर यांना समक्ष वेगवेगळया कंपनीच्या ०७ कसिनो मशिनच्या माध्यमातुन पैश्यांची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळवितांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ३,२६०/–रू., ०२ संगणक, वेगवेगळे ०७ कसिनो मशिन, व ईतर साहित्य असा एकुण २,००,२६०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, पाहीजे आरोपी दुकानमालक अभिषेक नावाचा इसम याचे मदतीने नमुद कॅसिनो जुगार खेळवित असल्याचे सांगीतले. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे कलम ४,५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. कैलाश देशमाने, सपोनि उमाकांत राठोड, पोउपनि संतोषकुमार राठोड, पोअं. प्रविण मरापे, राहुल खळतकर यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे बजाजनगर :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १०.०८.२०२६ चे ०२.१० वा. चे सुमारास, बजाजनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, दंतेश्वरी झोपडपट्टी, शिवमंदीरजवळ राहणारा एक हद्दपार इसम घरी आलेला आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे हद्यपार ईसम नामे रोहीत उर्फ चाकु धन्नु वर्मा वय ३२ वर्ष हा राहते घरी मिळून आला. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७३७/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने राहते घरी समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं योगेश्वर गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. धनाजी मारकवाड यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कपीलनगर :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०९.०८.२०२६ चे १५.३५ वा. चे सुमारास, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, अंगुलीमाल नगर, इंडीयन ऑईल पेट्रोल पंपजवळ एक निळया रंगाचा शर्ट घातलेला इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी कोयता काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव धिरज अशोककुमार पुष्पाकर वय २५ वर्षे रा. मिसाळ ले आऊट, मंगळवारी बजार, जरीपटका, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी कोयता किंमती ३००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने कोयता घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कपीलनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०८.०८.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक ०९.०८.२०२६ चे १३.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत सौभाग्यनगर, कविता कॅटरर्स मागे, राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती अंजली अरुणराव सातफळे वय ४० वर्ष हया आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाकडे म्हाळगीनगर येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून,

बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्याचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती ७,२१,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. प्रविण वाकडे ७५८८५३७१९२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे गिट्टीखदान :—** दिनांक ०९.०८.२०२६ चे १७.०० ते १७.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, व्हाईट हाऊस चौक, वाडी रिंग रोड येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाच यांनी, एका वाडीकडून येऊन यु टर्न घेत हळु जाणाऱ्या आयशर ट्रकचे समोरील व मागील चाकाचे मध्ये स्वत: उडी घेतल्याने चाकाखाली येऊन जागीच मरण पावले. ट्रक तेथून निघून गेला. घटनास्थळाजवळ हजर फिर्यादी दिनेश सुखलाल गौतम वय ३५ वर्ष रा. हजारीपहाड यांनी सांगितले की, वरील मृतक हा त्यांचे चहाचे ठेल्यावर त्यांचेजवळ आला होता व त्याने तो बंगाल येथून आला असून कामाचे शोधात आहे, तसेच बरेच दिवसापासुन उपाशी असल्याचे सांगितल्याने, फिर्यादीने त्याला चहा पाजला होता. तेव्हा त्याने 'मै मर जाऊंगा' अशी मरणाची भाषा केली होती. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन— अंगात निळा रंगाचा व गोल गळयाचा हॉफ टिशर्ट व निळया रंगाचा ट्रॅकपॅन्ट ज्यावर पिवळया रंगाची उभी लायनिंग असलेला व पायात निळया लाल रंगाचे जोडे घातलेले आहेत. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. पठान यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हा न्यायाधीश —८ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | १०००४० /२०१२ | कलम ३०२ भा.दं.वि. | भीम व्ही. मुळे रा. चिरकुट शेंडे यांचे घरी, खैरी, नागपुर | १४.०८.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**